दिनांक: १२ जुलै २०२१

मासिकांक ५

# “ती”चं पान

## तिच्याकडून सगळ्यांसाठी

संपादक: सौ. सायली अक्षय देशपांडे

# अनुक्रमणिका


| | शीर्षक | लेखिका | पान क्र. |
|---|---|---|---|
| १ | प्रस्तावना | सौ. सायली देशपांडे | ३ |
| २ | दोन शब्द | सर्वेश फडणवीस | ४ |
| ३ | किती सरी.. | कु. भार्गवी बाबरेकर | ६ |
| ४ | बरसूनी आले रंग प्रीतीचे.. | कु. स्वर्णिमा प्रकाश | ७ |
| ५ | पावसाळ्याचे दिवस | कु. सिध्दी पांडे | १० |
| ६ | पाऊस पहिल्यासारखा | कु. प्राजक्ता बर्वे | १२ |
| ७ | पाऊस तुझा नि माझा.. | सौ. मृण्मयी सारंग | १३ |
| ८ | पर्जन्य सरी | सौ. रेणुका देशपांडे - कुकडे | १४ |
| ९ | अवनी आणि मेघश्याम...! | सौ. सायली देशपांडे | १७ |
| १० | पाऊस, ती आणि मी | सौ. तृष्णा आंबेकर | २० |
| ११ | समारोप | सौ.सायली देशपांडे | २६ |

# प्रस्तावना

कालच " आषाढस्य प्रथमदिवसे " अर्थात महाकवी कालिदास दिन साजरा झाला. ऋतूचक्राप्रमाणे आषाढ महिना हा पावसाची सुरुवात मानला जातो. ग्रीष्म ऋतुमुळे निसर्गातल्या प्रत्येक घटकाची काहिली होत असताना, ती शांत करण्यासाठी, त्यांना नवचैतन्य देण्यासाठी, पावसाचं आगमन होत असतं. पाऊस म्हंटला की नवनवीन कविता, कथा या नवोदित तसेच लेखक, कवायीत्रींसाठी आनंददायी ठरतात. आपल्या मनातल्या विचारांनासुद्धा एक नवीन पालवी फुटते आणि काहीतरी छान सर्जनशील लिखाण जन्माला येतं. त्याच पावसाला मध्यवर्ती ठेवत यंदाच्या तीचं पान च्या पाचव्या मासिकांकात पावसावर आधारित लिखाण आपल्यासारख्या रसिक वाचकांसाठी घेऊन आलो आहोत.

पाऊस एकच असतो मात्र त्याच्याशी संबंधित प्रत्येकाच्या आठवणी या वेगवेगळ्या असतात. एकच पाऊस प्रत्येकाला वेगवेगळा भासतो. कधी आनंद देतो, तर कधी दु:खाची किनार त्याला लाभलेली असते. या अंकात प्रत्येकीनेच तिचा असा पाऊस शब्दबद्ध केला आहे. मला आशा आहे की तिच्या शब्दसरींमध्ये तुम्ही नक्कीच न्हाऊन निघाल. या अंकाला दोन शब्द या स्वरुपात सर्वेश फडणवीस या नवोदित लेखकाच्या शुभेच्छा लाभल्या आहेत, ह्याचा विशेष आनंद आहे. तसेच कायमच या अंकाला बाह्यरूपाने सजवणारे आणि अंकात असलेल्या विषयाला चपखल बसेल असे मुखपृष्ठ आणि मलपृष्ठ अतिशय सर्जनशीलतेने तयार करणारे अक्षय देशपांडे याचे मी विशेष आभार मानते तेव्हा "ती"च्या पावसाच्या प्रवासात तुम्हीसुद्धा सहभागी होऊन आनंद घ्या...

- सौ. सायली अक्षय देशपांडे

# दोन शब्द

अथांग चिंब भिजवणारा पाऊस !!

ती चं पान... तिच्याकडून सगळ्यांसाठी या मासिकांक साठी मध्यंतरी सायली पेशवे देशपांडे हिचा फोन आला. तिने पाऊस याविषयी लिहिण्याचा आग्रह धरला. खरंतर 'ती' च्या पानात त्याला ही जागा मिळते आहे याचा अधिकचा आनंद आहे. आज आपल्यासारख्या नवोदित लेखकांना हे हक्काचं व्यासपीठ या निमित्ताने उपलब्ध करून दिल्याबद्दल तिचें मनःपूर्वक अभिनंदन.

खूप दिवसांनी पाऊस अनुभवला. गर्मी आणि उन्हाळा चार महिने सहन केल्यानंतर त्याच्या येणाच्या चाहुलीने प्रत्येक जण जो आनंद अनुभवतो त्याची गोष्टच वेगळी आहे... गोष्ट नाही म्हणता येणार... पण मला जे काही वाटलं ते लिहितो आहे कारण हा माझा अनुभव आहे. पाऊस हा प्रत्येकाला हवाहवासा वाटतो. कुणी शब्दांतून,कुणी कवितेतून,कुणी गायनातून आपला आनंद घेत असतो. पण पाऊस या तीन अक्षरांनी सुद्धा मानवी मन काहीकाळ एका वेगळ्याच विश्वात स्थिरावल्या जातं.

अचानक संध्याकाळी ढग दाटून आले होते. दिवसभर ते वातावरण मनावर दाटलेलं होतं. घरात एरवी कोणी नसताना मला सहसा कंटाळा येत नाही, पण काल खरच खूप उदास वाटत होतं आणि थोड्याच वेळात तो आला... सगळ्यांचा जीवलग असा मित्र पाऊस... तो आला ते "मी आलोय, मी आलोय" अशी ढगांची गर्जना करतच आला आणि शेवटी बराच वेळ बाल्कनीतून बघताना हातात धरलेलं पुस्तक खाली ठेवलं आणि बाहेर गेलो आणि बघितले तर पाऊस आनंदाने मनमुराद बरसत होता. त्याच्या सरी अंगणातल्या झाडांना तृप्त करत होत्या. अर्थात झाडांवर जो हिरवेगार आणि टवटवीत पणा बघताना प्रत्येक मानवी मनाला आनंद होतो तर त्यांना किती आनंद होत असेल हे त्यांच्या हालचालीने समजत होते कारण तो आल्याचा आनंद त्यांना ही झाला होता रोज रोज अशी संधी त्यांना कुठे मिळते .

खूप दिवसांनी असा मस्त पाऊस पडताना आज इतकं निवांत पहाता येत होतं. नुकतीच नवी शाळा सुरू झालेली शाळकरी मुले छान सायकलवर भिजत चाललेली बघत होतो. आपणही शाळेत असच भिजायचो हे आठवून मनातच हसायला आलं. त्या त्या वयाची ती ती मजा असतेच.

तेंव्हा आईने हजार वेळा सांगूनही मुद्दाम रेनकोट विसरून शाळेला जाताना बऱ्याच जणांना आठवेल आणि मग संध्याकाळी भिजून आल्यावर आई रागवायची आणि भिजून आल्यामुळे नंतर छान गरमागरम चहाही करून द्यायची आणि त्या चहानं पावसाचा गारवा कुठल्या कुठे पळून जायचा,एकदम एका क्षणात हे आजही आठवताना आठवणीत रमताना आजही आवडतं. झाडांच्या पानांवरून पाण्याचे चिमुकले थेंब पडताना पाहिले आणि इतके छान लयीत पडत होते ते की न राहवता फोटो काढण्याचा मोह आवरता आलाच नाही. झाडाच्या पानावर ऐटीत बसलेले पाण्याचे थेंब... जणू काही मोतीच असल्याचा भास होत होता म्हणूनच मोत्यांना 'पाणीदार' म्हणत असतील असे वाटले.

ते दिवस आणि आजचे दिवस यात नक्कीच फरक पडला आहे. आज मस्त पाऊस पडला की टपरीचा वरचा चहा-भजी आणि गरमागरम भुट्टे. मित्राच्या गाडीवर बसून फिरायला जाणं हे आम्हा तरुणांनी पावसाळी वातावरण आला की ओघाने नेहमीच करायचं ठरवलेलं असतं. मग गड किल्ल्यांची भ्रमंती,घाटावरचा पाऊस,नैसर्गिक धबधबे,छान धुक्यातून गाडी चालवणे ही सगळी मज्जा अनेकजण करत असतात. खरंतर ते करणे ही मानवी मनाची सहज प्रक्रिया आहे. उन्हाळ्याच्या घामाच्या धारेतून हे पावसाचे तुषार मन आल्हाददायक करतेच पण चैतन्य निर्माण करणारा असा हा पाऊस असतो. पावसाचा आणि मानवी भावनांचा अतिशय निकटचा संबंध आहे. भावना उत्कटपणे व्यक्त करण्याचं कदाचित पाऊस हे केवळ माध्यम असावं.

पण दरवर्षी नियमित कोसळणाऱ्या पावसानं मला खूप आनंद दिला, एव्हढं मात्र खरं....कुठल्यातरी कवीने म्हंटले आहेच "देणाऱ्याचे हात हजारो, दुबळी माझी झोळी ". दरवर्षी अथांग चिंब भिजवणारा पाऊस आणि त्या आठवणींच्या गावी मन काही काळ स्थिरावतेच आणि ते सहज होणे ही अगदी खरं आहे...

- सर्वेश फडणवीस

# किती सरी..

किती आभाळ दाटून आले
अंगावर आले शहारे किती..
किती सरींनी भिजले अंगण
अन् कोरडे ते उरले किती..!

किती किती ती आभाळमाया
बरसून रीतीच झाली किती..
किती क्षणांची उजळणी झाली
विसरून गेलो न जाणे किती...!

किती निळे अन् सावळे मेघ
कडाडणाऱ्या विजा किती..
थोडी फुंकर आठवांवरी
बाकी उरल्या सजा किती..!

किती वेडा तो तुझाच पाऊस
खिडकीतून मी पाहिला किती..
हातावर मी झेलून त्याला
त्यात नाहले सांगू किती..!

किती सांगू.. किती बोलू !
मी रचल्या तुझ्या कविता किती..
व्यक्त कसे मी होऊ आता?
शब्द अपुरे पडती किती..!

- कु. भार्गवी बाबरेकर

# बरसूनी आले रंग प्रीतीचे..

पाऊस तोच..पण प्रत्येकासाठी वेगळा..कोणी त्यात बालपण शोधतं.. तर कोणी आपलेपण.. पाऊस अनुभवण्याची पद्धत पण प्रत्येकाची वेगळी..लहान मुलं पाऊस पडला की साचलेल्या पाण्यात कागदाच्या होड्या सोडून पावसाचा आनंद घेतात..तर तरुण मंडळी चहा, कॉफी, भजे आणि भूट्टया सोबत पावसाचा आनंद घेतात.. प्रेमात पडलेल्यांना तर पावसाळा म्हणजे पर्वणीच! आणि ज्येष्ठ मंडळी जुन्या आठवणींना नव्याने उजळा देत (पडत असेल्या) पावसाचा आनंद घेतात..

पहिला पाऊस पडला की उन्हाळ्यामुळे मुर्गळलेली झाडं ही एकदम ताजी तवानी होतात! साचलेली धूळ निघून गेल्या मुळे एकदम टवटवीत होतात....

सगळीकडचं वातावरण एकदम बदलून जातं..फ्रेश फील होता!

पण खरंच सगळ्यांसाठीच पाऊस हा मनाला प्रफुल्लित करणारा असतो का!?

केशव तिच्या याच विचारात मग्न असताना त्याला तो प्रसंग आठवला.. असं म्हणतात शारीरिक जखमा एक वेळेस पटकन भरून निघतील पण मनावर खोल आत झालेल्या जखमांचं तसं नसतं...त्यांना भरायला वेळ लागतो..आणि केशवच्या मनावर झालेल्या जखमा तर प्रत्येक पावसागणिक आणखीनच ताज्या होत होत्या...

तर...केशव आणि स्वरा बालपणीचे मित्र. एकत्रच वाढले,बगडले, शिकले.. एकत्रच लहानाचे मोठे झाले असं म्हणायला हरकत नाही. अगदी शाळा आणि कॉलेज ही एकच! पुढे याच मैत्रीचं रूपांतर प्रेमात झालं. खरंतर त्या दोघांनाही एकाच कंपनीत नोकरी करायची होती..पण ते काही जमलं नाही.. त्यामुळे नोकरीच्या निमित्ताने केशव मुंबईला तर स्वरा बंगलोरला गेली. आत्ता पर्यंत कधीही एकमेकांपासून लांब न राहिलेले हे दोघं आत्ता चक्क long distance relationship मध्ये होते! पण गंमत अशी की याच काळात त्यांचं एकमेकांवर असलेलं प्रेम आणि विश्वास दुणावला आणि त्यांच्या नात्याची वीण आणखीन घट्ट झाली आणि त्यांनी लग्नाचा निर्णय घेतला. दोघेही बालपणीचे मित्र असल्याने त्यांच्या घरच्यांमध्येही छान घरोबा होता.

आणि मध्यंतरी केशवची आई बोलता बोलता म्हणाली सुद्धा होती की अगदी स्वरा सारखीच सून हवी म्हणून. हे ऐकुन केशव एकदम सातवे आसमन पे! त्याचं अर्ध टेन्शन जे कमी इथेच कमी झालं होतं!

एक १५ जुलैच्या नंतर ८-१० दिवसांसाठी सुट्टी घेऊन नागपूरला जायचं आणि घरच्यांना सगळं सांगायचं असं दोघांनी ठरवलं. आत्ता बघता बघता जून महिना संपत आला होता. दोघांनाही नागपूरला जाण्याचे वेध लागले होते. पुढे ठरल्याप्रमाणे दोघेही नागपूरला आले. घरच्यांना भेटले आणि त्यांना सगळं सांगितलं.

केशवच्या आईला स्वरा सून म्हणून आधीपासूनच पसंत असल्याने त्यांनी लग्नाला लगेच होकार दिला. स्वराच्याही घरच्यांची या लग्नाला काहीच हरकत नव्हती. त्यामुळे त्यांनीही लग्नाला लगेच होकार दिला. आणि आत्ता साखरपुडा उरकूनच दोघांना परत पाठवायचं असं घरच्यांनी ठरवलं.

जुलैच्या शेवटच्या आठवड्यात लग्न ठरलं, ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात साखरपुडा झाला आणि डिसेंबर महिन्यात लग्न करायचं ठरवून दोघेही सुट्टी संपवून आपापल्या गावाला परतले.

स्वराची ना एक जुनी सवय होती..ती केशावच्या प्रत्येक वाढदिवसाला त्याला आवडते म्हणून शेवयांची खीर करायची खास त्याच्यासाठी. खरंतर हा या वर्षीचा त्याचा वाढदिवस जरा स्पेशलच होता त्याच्यासाठी..लग्न जे ठरलं होतं त्याचं! पण नेमकं याच वर्षी तो पहिल्यांदा शेवयांची खीर miss करणार होता. पण स्वरा..तिनी पूर्ण ठरवून ठेवलं होतं केशवला surprise द्यायचं! ती त्याच्या वाढदिवसाच्या दिवशी सकाळच्या फ्लाईट नी बंगलोरहून मुंबईला आली. टॅक्सी केली आणि केशवच्या फ्लॅटवर जायला निघाली. सगळंच अगदी छान, मनासारखं घडत असल्याने ती फार खुश होती आज.

पण ते म्हणतात ना, कितीही प्रयत्न केला किंव्हा कितीही ठरवलं तरी नियतीच्या मनातलं आपण काही ओळखू शकत नाही! आत्ताही अगदी तेच झालं! एकतर आधीच पावसाळ्याचे दिवस असल्याने बाहेर चांगलाच पाऊस पडत होता.. पण इतर वेळी छान वाटणाऱ्या याच पावसाने यावेळी घात केला!

ती ज्या पुलावरून जात होती, पावसामुळे त्या पुलाचं बांधकाम कुचकं होऊन नेमका तो पुल त्याच वेळी कोसळला! हजारोंनी लोकं जखमी झाले! काहींना तर विनाकारण आपला प्राणही गमवावा लागला!

केशवला हे कळताच तो आहे त्या परिस्थितीत धावला आणि स्वराला आणि तिथल्या इतर लोकांनाही दवाखान्यात घेऊन गेला. घडलेल्या अपघातचं नागपूरला कळताच दोघांचेही आई - वडील  मुंबईला आले. जवळ जवळ महिनाभर स्वरा दवाखान्यात होती. महिनाभरानंतर ती आज जरा बरी वाटत होती. पण तरी तिला अशा अवस्थेत पाहून आई बाबांना रडू आवरेच ना! पण त्यांनी कसंबसं सावरलं स्वतःला. आज महिन्याभराने डॉक्टरांनी तिला भेटण्याची परवानगी दिली होती. त्यामुळे आज खूप दिवसांनी आपल्या लेकीला जवळून पाहता येईल, तिला भेटता येईल  तिचे आई बाबा आज खूप खुश होते.

पण त्यांच्यासमोर आत्ता दुसरच आव्हान उभं होतं ज्याची त्यांना कल्पनाही नव्हती. स्वराची तर परीक्षा देऊन झाली होती, पण आत्ता तिच्या आई बाबांची आणि केशवची खरी परीक्षा होती असं म्हणायला हरकत नाही.

आज आई बाबा स्वराला भेटायला गेले असता त्यांना तिच्या डोळ्यात वेगळेच भाव दिसले. ते बघून तिच्या आईच्या मनात चर्रच झालं. काही तरी गडबड असल्याचं त्यांना जाणवलं. डॉक्टरांना विचारल्यावर त्यांनी सांगितलं की डोक्याला जखम झाल्यामुळे तिला स्मृतीभ्रंश झालाय. हे ऐकुन सगळ्यांना धक्काच बसला आणि केशवच्या तर पायाखालची जमीनच सरकली! पुढे हळू हळू स्वराची तब्येत सुधारू लागली, उपचारही सुरूच होते तिचे.

दिवसामागून दिवस जात होते. पाहता पाहता डिसेंबर महिना उजाडला.डिसेंबर महिन्यात लग्न करायचं असा हट्ट होता स्वराचा. पण...सगळंच सगळंच चित्र पालटून गेलं होतं! सगळ्यांसाठीच! सगळंच अगदी अवघड होऊन बसलं होतं!

आज जरा निवांत वेळ मिळाल्यामुळे केशव त्याच्या नेहेमीच्या बगीच्यात फिरायला आला होता; स्वरा आणि तो नेहेमी याच बगीच्यात भेटायचे.  फिरून झाल्यावर तो त्यांच्या नेहेमीच्या जागेवर बसला. तो त्याच्या विचारांमध्ये मग्न असताना एकदम ढगांच्या गडगडाटामुळे तो भानावर आला आणि त्याचं लक्ष समोर उभ्या असलेल्या स्वरा कडे गेलं. ती आज त्यानी तिला दिलेला ड्रेस घालून आली होती. तिला समोर बघून केशवला काही सुचेनासंच झालं! ती त्याच्या जवळ आली. दोघेही एमेकांकडे बघत असतानाच पुन्हा एकदा जोरात पाऊस पडायला सुरुवात झाली..आणि.. आधीच प्रेमाच्या पावसात चिंब भिजलेली ती दोघं या पावसात पुन्हा एकदा चिंब भिजलीत..

पण त्यांचं हे भिजणं नक्की पवसातलंच होतं ना...!?

- कु. स्वर्णिमा प्रकाश

# पावसाळ्याचे दिवस....

पहिल्या सरी नुकत्याच बरसलेल्या, ती वेळ होती संध्याकाळची अन् वातावरणात पसरलेला गारवा. पक्ष्यांची आपल्या घराकडे परतण्याची ती वेळ अन् हिरवागार शालू नेसलेल्या मोहक अश्या मनोहारी निसर्गाचे सौंदर्य टिपण्यात मग्न झालेली ती...

या निसर्गाच्या सानिध्यात उंबराठ्यावर बसलेली ती, जुन्या नव्या अनेक घटनांना उजाळा देत होती.उन्हाळा सरला होता अन् पावसाच्या सरी नुक्त्याच बरसून गेल्या होत्या. निरभ्र आकाशाप्रमाणे चित्त कसे शांत , निवांत अन् स्वच्छ झाले होते. एवढ्यातच आज एकचित्त होऊन ती विचार करायला लागली, या आधुनिकतेच्या युगात उच्च विद्यावभूषित असलेली ती नववधू, तिच्या मनी अनंत काळापासून चालत आलेला आपला सांस्कृतिक वारसा जपण्याची आस तर होतीच त्यांचं बरोबर या विज्ञानाच्या क्षेत्रात प्राविण्य मिळवताना आपल्या सनातन अश्या संस्कृतीचा पडत चाललेला किंचितसा विसर; या मध्येच ती घुटमळू लागली जणू यातच तिचा कस लागत चालला होता. ती शोधच घेत होती पुढल्या काही दिवसांची बहुधा सांगड घालत होती ती आधुनिकता अन् परंपरांची.

पावसाळ्याचे दिवस म्हणजे अर्थातच सणांचा ऋतु पावसाळ्यात जसा हिरवा रंग निसर्गराजा परिधान करतो तसाच सुवासिनींचा श्रृंगारही हिरव्याच रंगात साजतो आणि केवळ म्हणूनच ती नववधू सर्व सण- उत्सव मोठ्या उत्साहात साजरे करण्याची तयारी करू लागते . तेवढ्यातच आजच्या युगतल्या तिला तिच्या उंबरठ्याबाहेरील जीवनातील कर्तव्याची चटकन जाणीव होते , स्वतःला सध्याच्या युगात उच्च विदयाविभूषित समजणाऱ्या तिला , आत्ताच्याच भाषेत सांगायचे झाले तर highly qualified असणाऱ्या तिला स्वतःच professional जीवन आणि सुख सोईची आठवण झाली तोच उत्साहाने आपल्या संस्कृतीतील परंपरांना अपुल्या रूढींच्या मुळाशी घट्ट रोवू पाहणाऱ्या त्या स्वप्नसुंदरीला वास्तवाशी सांगड घालणे अशक्यप्राय वाटू लागते, तरीही प्रतिकूल परिस्थितीत कुटुंबाचा गाडा सुरळीत पार पाडण्यासाठी ती धडपडते अन् अंती मात्र ती नववधू जी आपल्या माहेरी हट्टी, लाडकी लेक म्हणून मिरवायची ती आपसूकच आपला आपल्या जीवनाचा स्वतःच्या आवडी-निवडीचा क्षणार्धात त्यागही करायला मागे पुढे बघत नाही.

बाबा आणि नंतर आजोबांचाहीआधार नसताना तिनेच न खचता, आपल्याला जिद्दीने शिकायला लावलं.

मग ती भलेही भल्या मोठ्या हुद्यावर कार्यरत का असेना, सासरचा उंबरठा ओलांडता क्षणी ती , सून, पत्नी, वहिनी , आई अश्या अनेक नात्यांच्या बंधनात अडकत जाते हे नाकारणे अशक्यच असते, जेव्हां ती सुवासिनी असते.

पाऊस अन् या पावसात मनसोक्त स्वप्नदुनियेत भटकणाऱ्या तिला त्या क्षणी मात्र माहेर अन् सासरचा उंबरठा यातील अंतराची चटकन जाण होत असावी अन् टचकन येणारी डोळ्यातील असावं जबाबदारीच्या ओझ्याखाली विरून जात असावी आणि म्हणूनच हा पाऊस जसा सोसाट्याच्या वाऱ्यासह गगनात नृत्य करतो त्याचप्रमाणे त्या नववधूच्या मनातही अनेक विचारांचे काहूर उठते अन् म्हणूनच पाऊस अन् ती यांची तुलना करण्याचा अट्टाहास...!!

- कु.सिद्धी मुचकुंद पांडे

# पाऊस पहिल्या सारखा

नभ आक्रमिती तसेच अजूनी,मात्र, नाही मेघ पहिल्या सारखा
सांगा कोठे पडतो हल्ली, पाऊस पहिल्या सारखा

हरवली कागदाची होडी,सापडली तर सांगा नक्की
शोधता शोधता जाहलो मोठे,समोर राहिले डबके बाकी
माती चा त्या सुवासही आता,नाही पहिल्या सारखा
सांगा कोठे पडतो हल्ली, पाऊस पहिल्या सारखा

रंगीत फुले पण पहा हरवली,काय जाहले कळले नाही
भिरभिर फिरणारी फुलफाखरे,दृष्टीस पुन्हा आढळली नाही
वाऱ्यातील बदलही उठवत नाही, शहारा पहिल्या सारखा
सांगा कोठे पडतो हल्ली, पाऊस पहिल्या सारखा

उगाच जाहलो फार मोठे,बसलो हरवून दृष्टिकोनाचा लोलक
म्हणावेसे वाटते आता, बरे होतो आपण as a बालक
भिजण्यातही नाही उरला, आनंद पहिल्या सारखा
सांगा कोठे पडतो हल्ली, पाऊस पहिल्या सारखा

विज चमकली आता अशी की,खाडकन मी जागा झालो
अवती भवतीचे सारे बदल, चक्क निरखून पाहू लागलो
सारे पहिल्या सारखेच होते, पाऊसही पहिल्या सारखा
ध्यानात आले सारे आता, मीच नाही पहिल्यासारखा

- कु. प्राजक्ता बर्वे

# पाऊस तुझा नि माझा...

तुझा आणि माझा पाऊस म्हणजे समुद्राचे दोन भिन्न दिशेला असलेले टोक. तुझ्या पावसाची माझ्या पावसासोबतची भेट म्हणजे बरसत्या सरींमध्ये एकरूप होऊ बघणाऱ्या किरणांमुळे क्वचितचं जन्माला येणाऱ्या इंद्रधनुष्या सारखी. माझा पाऊस म्हणजे धो धो बरसणारा, विजेच्या कडकडात सतत उराशी बाळगून बेभान बेफिकीर बरसणारा, त्यातही पहिला पाऊस म्हंटला की मग बेफकीरीला सीमाचं नाही. कुठही , कसही , मुक्तपणे बरसणं इतकचं काय ते माझ्या पावसाला ठाऊक. कोरड्या निराश मनाला चिंब करून टाकणारा माझा पाऊस. पहिल्यांदाच आणि नव्याने प्रेमात पडू पाहणाऱ्या मनासाठी तर हा पाऊस म्हणजे अमृतच... तुझा पाऊस मात्र शांत ,संथ , सुखावणारा , विसावा देणारा.

स्वत:च्या संथ सरींनी धरतीला चिंब करून तिला मोहून टाकणे आणि त्यातून निर्माण होणाऱ्या सुगंधाने स्वत:चे अस्तित्व खुलवणे हाचं तुझ्या पावसाचा गुण. त्यादिवशी असाचं बेभान होऊन माझा पाऊस बरसत बरसत जरासा दमलेला, पर्वताच्या अलीकडे विसावला. जरा वेळानी त्याला पलीकडे कोणी तरी असल्याचा भास झाला आणि त्याला भेटला तिथे विसावलेला तुझा पाऊस. भेटता क्षणी का कोण जाणे दोघेही स्थिरावले जरा थांबले आणि फक्त बघत राहीले. त्या विजेच्या एका कडाडण्याने दोघांनाही भानावर आणले. क्षणभर कळलचं नाही काय होऊन गेलं ते दोघांनाही. तुला माझ्यातला बेभामपणा आवडला आणि मला तुझ्यातला ठेहरावं.

सतत धो धो बरसून मी शोधत असलेला विसावा कदाचित मला तुझ्यात जाणवला आणि कायम नियमबद्ध असं बरसण सोडून तू ही कधीतरी बेभान होऊन बरसण पसंत केलसं. त्या काही स्थिरावलेल्या क्षणात खूप काही होऊन गेले. न बोलता सुद्धा आपण खूप काही व्यक्त होऊन गेलो. कधी तुझा नी माझा पाऊस एक होऊन आपलासा झाला कळलेचं नाही... आता आपल्या पावसाला जणु पुर्णत्व मिळालयं. धो धो मुक्तपणे बरसूनही तितकाचं शांत आणि सुखावह आहे आपला पाऊस. आकाश धरती ज्याप्रमाणे क्षितीजाजवळ एक होतात तसाचं काहीसा अनुभव एकरूप बरसणारा आपला पाऊस मला देतो...

- सौ. मृण्मयी सारंग

# पर्जन्य सरी

आज गावाहून आई येणार म्हणून तो सकाळी आनंदात उठला खरा,पण त्याच्या उत्साहावर विरजण पडायला काही वेळ लागला नाही. अजून पलांगवरच आळोखे पिळोखे देताना खिडकी बाहेर नजर गेली आणि भरून आलेलं काळकुट्ट आभाळ बघून त्याच्या कपाळावर आठया चढल्या. "च्यायला काय कटकट आहे!" नाखुशिने उठून अन्हिक आवरताना तो स्वतःशीच पुटपुटला.

पावसाची आणि त्याची लहानपणापासूनच कट्टी होती. अगदी लहानपणी बाहेर खेळता यायचं नाही, म्हणून पाऊस नकोसा वाटायचा . थोडी समज आल्यावर पावसाच्या लहरीपणामुळे त्याचा पारा चढायचा. आजोबा त्याची समजूत घालताना म्हणायचे-"अरे बाळा, पाऊस जीवनदायी असतो. अन्नाद्भवन्ति भूतानि पर्जन्यादन्नसम्भवः |" आजोबांचं मन राखायला तो शांत व्हायचा. वडील गेल्यानंतर आईचा आणि त्याचा भक्कम आधार झालेले आजोबा, तेही अश्याच एका संततधार पावसाळी दिवशी अचानक गेले, तेव्हापासून मात्र मनातली पावसाबद्दलची अढी अजूनच घट्ट झाली.

"Friends, पावसाची मजा लुटताय ना? I just love rains! या मस्त romantic वातावरणात हे रोमँटिक गाणं खास तुमच्यासाठी! " मागे radio jockey खोट्या गोड आवाजात चिवचिवत होती.

"अरे कसला रोमँटिक! काय हा पोरकटपणा!कविता कादंबऱ्यांमधला पाऊस असेल कदाचित रोमँटिक! पण पोटापाण्यासाठी राबणाऱ्या आमच्यासारख्या लोकांचा किती खोळंबा होतो या पावसाच्या पिरपिरीमुळे, ते आम्हालाच विचारा! तुंबलेले रस्ते, बेडकांच्या फौजा, चिखलाच्या पायघड्या, गढूळ पाणी, न वाळणाऱ्या कपड्यांचा कुबट वास. नेमकं काय romantic वाटतंय यात? पाऊस म्हणजे राडा असतो राडा. आता manager समोरच्या presentation साठी काल कडक इस्त्री करून ठेवलेला lucky शर्ट पावसात हमखास खराब होणार. चकचकीत पॉलिश केलेल्या काळ्याशार बुटांना चिखलाचं आवरण चढणार. " स्वतःशीच बडबडत, वैतागत त्याचं सगळं आवरून झालं सुद्धा! घराबाहेर पडताना घड्याळीकडे नजर टाकली. " yes! right on time! आज काही आपली 7.52 ची local चुकत नाही. ऑफिस मधलं presentation एकदाच नीट पार पडून आपण परतू तोवर आई इथे पोहोचलेली असेल. आपल्याला या ऑफिसच्या सुटाबुटात बघून कोण अभिमान वाटेल तिला! खरं तर, त्याचं श्रेय तिलाच आहे.

कितीक खस्ता खाल्ल्या पण आपल्याला नाही कधी झळ लागू दिली. आता ती आली की तिला परत गावी जाऊच द्यायचं नाही. अगदी ऐशोआरामात ठेवणार आपण तिला." डोक्यातलं विचारचक्र आणि बुटातली पाऊलं, दोघांनीही वेग धरला होता.

लोकल गाठायला स्टेशनात शिरणार त्याआधी एका जोरदार शिरव्याने त्यालाच गाठलं. कितीही काळजी घेली तरी कपडे, जोडे खराब होणं, चिंब भिजून लोकलच्या गर्दीत रेटारेटी सगळे प्रकार अपेक्षेप्रमाणे पार पडलेच. ऑफिसला पोहोचल्यावर अवतार जमेल तितपत बरा करून manager च्या केबिन मध्ये गेला, पण  presentation च्या वेळी नेमका लॅपटॉप सुरू होईना. लॅपटॉप ओला होऊन खराब झाला की काय म्हणून पावसाला पुन्हा मनात 2-4 शिव्या घातल्या. Pen drive मधे बॅकअप असल्याने कसंबसं presentation पार पडलं, पण एकंदरीत त्याचा विरस झाला तो झालाच.

आता संध्याकाळी आई पोहोचणार, या एकाच विचाराने जरा सुखावून तो कसातरी दिवस पुढे ढकलत राहिला. lunchtime ला canteen मध्ये डब्बा उघडून पहिला घास घेतला, तेवढ्यात canteen मधल्या tv वर ती दुर्दैवी बातमी झळकली.

"breaking news- कोयना एक्स्प्रेसला तारगाव जवळ भीषण अपघात. निश्चित आकडा हाती आलेला नसला तरी मोठ्या प्रमाणावर जीवितहानी झाल्याची शक्यता."

निर्विकार चेहऱ्याने पत्रकार बाईने बातमी वाचली आणि त्याच्या काळजाचा ठोकाच चुकला. घास घश्यातच अडकला. आ वासला गेला आणि अंगाला घाम फुटू लागला.  तो जागच्या जागी जणू गोठलाच. "गेल्या 50 वर्षांतला हा सर्वात मोठा रेल्वे अपघात मानला जातोय. अपघाताचं नेमकं कारण अद्याप कळलेलं नसलं तरी यामागे घातपाताची शक्यता आहे, असं अधिकाऱ्यांचं म्हणणं आहे.  याबाबत अधिक माहिती देतात आहेत आमचे पत्रकार......" बातमी वाचन सुरूच होतं. अचानक शुद्धीवर आल्यासारखं वाटून त्याने आधी आईचा नंबर फिरवला. not reachable. दोनदा, तीनदा, चारदा.. काय करावं ते न सुचून तो नुसताच आईला फोन लावत राहिला. प्रत्येक वेळी उत्तर तेच. not reachable. त्याच्या अंगाला कंप फुटला, नकळतपणे डोळे भरून येऊ लागले.

redial. not reachable.

redial. not reachable.

बातमी अजून सुरूच होती. "तत्परतेने सगळी सरकारी यंत्रणा कामाला लागली आहे, बचावकार्य युद्धपातळीवर सुरू झालेलं आहे. पण सतत कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे म्हणावं तितकं यश अजून तरी मिळत नाहीये.  ऐकुया याबद्दल रेल्वे मंत्र्यांची प्रतिक्रिया.."

शब्द कानावर पडत असले तरी मेंदूपर्यंत पोहोचत नव्हते. बधीर झाले होते सर्वांग. यांत्रिकपणे हाताची बोटे तेवढी फिरत होती मोबाईल वर.

redial. not reachable.

redial. not reachable.

redial. not reachable.

आणि अचानक एका क्षणी redial नंतर रिंग ऐकू आली. श्वास जलद झाले, हृदयाचे ठोके वाढले. प्राण कानात आले.

ट्रिंग ट्रिंग. ट्रिंग ट्रिंग.

"हॅलो?"

आईचा आवाज कानावर पडला आणि  त्याचा बांध फुटला. सुटकेच्या हुंदक्या बरोबर एकच शब्द कसतरी बाहेर पडला.

"आई!"

" हॅलो, अरे राजा! आता तुलाच फोन करणार होते. अरे सकाळी गाडीची वेळ बघून स्टेशनला जायला निघाले. पण काय तो पाऊस सांगू. आधी कितीतरी वेळ मला रिक्षाच मिळेना. नंतर जी रिक्षा मिळाली ती रस्त्यात बंद पडली रे. गुडघाभर पाणी साचलेलं रस्त्यावर. त्यात चालायचं कसं. बाकी काही म्हणजे काहीसुद्धा साधन मिळेना रे. 2 फुटांवरचा दिसेना इतका पाऊस. सगळ्या गोंधळात गाडी चुकली रे माझी. आता कशीबशी घरी परत आले. मला ठाऊक आहे तुझा हिरमोड झाला असेल. काय बाई हा पाऊस मेला..."

टीव्ही वरच्या ब्रेकिंग न्यूजशी अनभिज्ञ आई भाबडेपणानी  बोलत होती. पावसाला नावं ठेवत होती. इकडे मात्र बाहेर कोसळणाऱ्या सरींनी त्याच्या मनातली जळमटं धुवून निघत होती आणि त्याच्या डोळ्यांतून कृतज्ञतेचा पाऊस बरसत होता. आजोबांना मनोमन स्मरताना त्याला जाणवलं, पाऊस खरोखरच जीवनदायी असतो.

सौ. रेणुका देशपांडे - कुकडे

# अवनी आणि मेघश्याम...!

माझी आणि त्याची ओळख बरीच जुनी।
त्याच्याशिवाय वाटायची प्रत्येक सकाळ सुनी।।

भेटीचा रतीब असल्यासारखा यायचा तो रोज।
म्हणायचा माझ्या शेल्यावरील तू चांदण्या मोज।।

मोजमाप करताना नेहमीच व्हायची चूक।
त्याच्या निव्वळ दर्शनानी कधीच भागत नव्हती माझी भूक।।

रेवती मृग रोहिणी अश्या असंख्य नक्षात्रांच्या गणतीत।
मी आपलं सुख साठवायची नेत्ररूपी पणतीत।।

दिवसांमागून दिवस गेले आले आषाढाचे मेघ।
मन घ्यायचं रोज त्याच्या येण्याचे वेध।।

दिवस नाही रात्र नाही तो चालतच असायचा।
माझ्या तप्त देहाकडे बघून तो हळूच खुदकन हसायचा।।

त्याच्या या हास्याचे रोज काढायचे मी अर्थ।
एकही क्षण जायचा नाही त्याच्या आठवणीशिवाय व्यर्थ।।

असाच तो एकदिवस आला आणि बरसला खूप।
त्याच्या त्या रौद्र रूपाच मला फार वाटलं अप्रूप।।

मनातल्या आठवणींचे मोती शिंपून गेला तो।

किती बरं नक्षत्रांचा पिता असेल तो।।

त्याचं सौंदर्य हा विषय झाला मजसाठी एकला।

जाता जाता देऊन गेला तो सप्तरंगी मेखला।।

मी आणि तो आहे विरही जीव।

येत नसेल का त्या ग्रीष्माला आमच्या अवस्थेची कीव।।

अशा त्या सुखद स्वप्नात संपली होती रात्र।

कारण मी झाली होती हरित शालू परिधान करण्यास पात्र।।

त्याच्या जलधारा मला वाटले अमृत।

या भाग्यास मी पात्र म्हणजे असेल मम् पूर्वसुकृत।।

अविरत नादब्रह्म उमटवून गेला तो ध्वनी।

त्याच्या आनंदाची प्रचिती तो देऊन गेला मनी।।

नववधूच्या सौंदर्याचे मला मिळाले सौभाग्य दान।

या प्रसंगाने मना आले अवचित जरा भान।।

स्वप्न शृंखला स्मरून सगळी आले मलाच हसू।

अन त्याने अलगद पुसले माझे दवबिंदू रुपी आसू।।

अवीट अभंग अमर हे प्रीतीेचे प्रतिबिंब।

कळले मज तेव्हा होते मी पूर्ती ओलिचिंब।।

असाच होता तो एक मेघ या आभाळातला।

जणू घेऊन गेला तो मळभ माझ्या मनातला॥

तो एक मेघ आणि मी आहे अवनी।

माझा होकार घेतल्या खेरीज तो कसा जाईल आत्म सदनी॥

तो होता जलदानाचा सुंदर सावळा मेघ।

मी घेतला मम् नयनाने आनंदाचा वेध॥

मी होती अवनी तो मेघ सुंदर।

पुलकित झाली धरा तृप्तीने सरले अंतर॥

निखळ अविरत बरसवूनी त्या आपुल्या प्रेमधारा।

तृप्त केले तयानी अवनीच्या विरहभारा॥

अवखळ नजरबंदी होता तो रिता सावळा मेघ।

ओलेती पृथा लाजे डोळी काजळ रेघ॥

आसक्तीची तृप्ती करुनी रिता जाहला मेघ।

पृथेचे ते नयन निमाले उरे काजळ रेघ॥

त्या अथांग प्रेमात भिजूनी लाजूनी गेली ती क्षणभरी।

उरली तूर्त एकच काजळ रेघ तिच्या कृष्णनयनी॥

-सौ. सायली अक्षय देशपांडे

# पाऊस, ती आणि मी

शिखर ऑफिस सुटल्यावर आज सगळ्यांच्या आधीच ऑफिसमधून बाहेर पडला होता.. बाहेर नुकताच पाऊस पडून गेल्याने वातावरण अतिशय सुरेख होतं, त्या वातावरणामुळे तो मनोमन सुखावला होता.. तसंही काय एरवी सकाळी एकदा ऑफिसमध्ये आत शिरल्यावर दिवसभर बाहेरच्या जगाशी , निसर्गाशी काही संबंधच नसतो..एसी चा थंडावा शरीराला शीण येऊ देत नसला तरी थकलेल्या मनाला पुन्हा टवटवीत करायला, हिरव्यागार झाडांची गर्द दाटी ,नुकतच बरसून मोकळं झालेलं ते स्वच्छ सुंदर आकाश ,शरीराला आणि मनाला सुखावणारा हवेतील गारवा असं मन मोहून टाकणारं दृश्यच सर्वोत्तम ठरू शकतं असं शिखरला नेहमीच वाटायचं.. आणि आज बाहेर अगदी तसंच दृश्य होतं.. त्याच्या मनातलं....पाऊस हा त्याच्या विशेष आवडीचा आणि जिव्हाळ्याचाही.. कुठेही जायचं असेल तेव्हा घरातून निघताना रेनकोट घालून निघायचा पण येताना मात्र चिंब भिजूनच यायचा.. सुट्टीच्या दिवशी बाहेर पाऊस सुरू असताना गरम-गरम चहाचा कप हातात घेऊन निवांत गॅलरीत बसुन पावसाचा आनंद घेत बसावं, आणि उरलेला पूर्ण दिवस इथं बसून पावसासोबतच घालवावा असं त्याला वाटायचं,.. पावसाळ्यात गाणी ऐकणं, पुस्तकं वाचणं, कविता करणं, बासरी वाजवणं या सगळ्या गोष्टी गॅलरीतच त्याच्या आवडीच्या जागी बसुन चालायच्या, पाऊस म्हटला की शिखरच्या उत्साहाला नुसतं उधाण यायचं.. पावसात भिजत मित्रांसोबत बाहेर जाऊन बुट्टा खाणं हा तर पावसाळ्यातले चार महिने ठरलेला नित्यनेमच होता..शिखर ऑफिसला जरी बसने जात असला तरीसुद्धा काहीतरी कामाचं कारण शोधून तो ऐन पावसाची चाहूल लागली असतानाच आवर्जून घराबाहेर पडायचा .. थोडक्यात सांगायचं तर पावसात भिजण्याची संधी तो कधीच सोडत नव्हता,..

खरंतर गेल्या आठवड्यापासून शिखर ऑफिसच्या टेन्शनमुळे खूप डिस्टर्ब झाला होता, आणि आजतर बॉससोबत झालेल्या भांडणामुळे मूड जरा जास्तच खराब होता, तसाच विचार करत कितीतरी वेळ बसस्टॉपवरच बसला होता,परतीची बस आलेली दिसत असूनही तो तिथेच बसला होता, रोजची ओळख असल्याने कंडक्टरने आवाजही दिला पण शिखर बोलला,

" मी नंतरच्या बसने येईल", असं म्हणत शिखरने कंडक्टरला हात दाखवला ..

बस पुढे गेल्यावर शिखर पुन्हा तिथेच विचार करत बसला..तो विचारात पूर्णपणे गढला असतानाच पुढची बस येऊन समोर उभी राहिली,बस दिसताच थोडं भानावर येऊन त्यानी चौकशी केली आणि कसाबसा बसमध्ये चढला, जास्त कष्ट न घेता बसमध्ये चढल्या चढल्या समोर दिसलेल्या सीटवरच तो जाऊन बसला..इतर कुणी आपल्या बाजूने बसूच शकणार नाही अशा पद्धतीने त्याने पूर्ण सीट व्यापून टाकली.. त्यानंतर हात खिडकीतून किंचीत बाहेर येईल असा ठेवत हाताच्या कोनात मान फसवून खिडकीतून बाहेर बघत बसला, बाहेर अंधारुन आलं होतं, पुन्हा एकदा बरसण्यासाठी ढगांनी गर्दी केली होती पण शिखरचं आज तिकडे लक्षच नव्हतं ,त्याची नजर जरी बाहेर असली तरी विचारांनी त्याला बंदिस्त करून ठेवलं होतं..

काही अंतर समोर गेल्यावर बस सिग्नलवर थांबली आणि मागून एका खासगी कंपनीची बस येऊन  शिखरच्या बसच्या अगदी बाजूला येऊन थांबली.,त्या बसकडे नजर जाताच शिखरची विचारांची तंद्री पूर्णपणे तुटली..त्या बसवर खिळलेली त्याची नजर काही केल्या हटेना , तितक्यात मुसळधार पावसाने पुन्हा एकदा हजेरी लावली होती.. पावसाच्या बरसणाऱ्या सरींनाही पार करून आता तो तिला बघू शकत होता,इतका तो हरवून गेला.. तिने घातलेल्या पिवळ्या रंगाच्या कुर्तीमुळे तिचा चेहरा अधिकच उजळून दिसत होता, नाजूक पण धारदार नाकाची, गुलाबी ओठांची, सुंदर बोलक्या डोळ्यांची एक नाजूक परीच जणू बसच्या खिडकीतून पाहातेय असा शिखरला भास होत होता..शिखर एकटक तिच्याकडे बघत होता , वाऱ्याची झुळूक येताच तिच्या कुरळ्या केसांच्या बटा अलगद तिच्या गालाला स्पर्श करुन जात होत्या ..

पावसाचा अंदाज घेण्यासाठी तिने खिडकीतून हलकीशी मान बाहेर काढताच पावसाने ओल्या झालेल्या तिच्या बटा आता वाऱ्याने तिचा पूर्ण चेहरा झाकू पाहात होत्या.. पावसाचा जोर वाढला तसा पावसाचं पाणी तिच्या चेहऱ्यावर येऊ लागलं ..आता मात्र तिची चिडचिड होत असल्याचं शिखरच्या लक्षात आलं होतं.. शिखरला पावसावर ते तिचं चिडणंही आता खूप गोड वाटत होतं,.. तिने खिडकी बंद करण्याचा प्रयत्न केला ,पण तिच्याने बंद होत नव्हती, पुन्हा एकदा खिडकी बंद करण्यासाठी वळली त्यावेळी तिची नजर शिखरकडे गेली..

तेव्हा तो तिच्याचकडे बघत असल्याचं तिच्या लक्षात आलं ..,

रंगाने सावळा असला तरी फ्रेंचकट दाढी, हलकीशी मिशी,सरळ धारदार नाक आणि बोलक्या डोळ्यांच्या शिखरची प्रतिमा प्रथम दर्शनीच तिच्याही मनात घर करून बसली होती यात शंकाच नाही.. क्षणभर दोघंही एकमेकांकडे तसेच पाहत राहिले...खिडकी बंद करण्यासाठी खिडकीवर असलेला तिचा हात सरकला आणि झपकिनी खिडकी बंद झाली तसे ते दोघंही भानावर आले.. पुढच्या स्टॉपवर शिखर उतरला पण, त्याचं सगळं लक्ष मात्र तिच्या बसकडेच होतं .. बरीच पुढे गेल्यावर बस दिसेनाशी झाली तेव्हा नाइलाजाने त्याची पावलं घराच्या दिशेनं चालू लागली होती,पण मनाने मात्र अजूनही तो बसमध्येच होता, तिथेच, जिथे त्यांची पहिली नजरभेट झालेली.. रोज घराकडे जातांना झपाट्याने चालणाऱ्या त्याच्या पावलांचा वेग आज मंदावला होता , नेहमीप्रमाणे छत्री असूनही तो रस्त्याने भिजत जात असला तरीही आज त्याचं भिजण्याचं कारणंही खास होतं ,आज पाऊस तर होताच शिवाय आज 'ती' भेटली होती.. कदाचित 'तिच्या' भेटीचं गोड गुपित तो त्याच्या प्रिय 'पावसाला' आज सांगत होता..

दुसऱ्या दिवशी शिखर फक्त शरीराने ऑफिसमध्ये होता पण मनाने तो केव्हाच परतीच्या बसमध्ये जाऊन पोहोचला होता..आज ती आपल्याला दिसेल की नाही या विचाराने तो सारखा अस्वस्थ होत होता, पुन्हा एकदा तिला बघण्यासाठी तो आतुर झाला होता.. तिला भेटण्याची ओढ त्याला काम करू देईना.. ऑफिस सुटल्यावर जराही न थांबता शिखर थेट बसस्टॉपवर जायला निघाला.. तिला भेटायला, तिच्याशी बोलायला आतुर झालेल्या त्याच्या मनाला पुन्हा एकदा विचारांनी घेरलं होतं.., कालच्या सारखेच आजही एक बस चुकवून पुढच्या बसने निघण्याचा विचार मनात येतो न येतो तोच त्याचं लक्ष स्टॉपवरच्या शेवटच्या बेंचकडे गेलं..क्षणभर त्याचा स्वत:च्या डोळ्यांवर विश्वासच बसत नव्हता,ही 'तीच' हे त्याच्या लक्षात आल्यावर तर त्याच्या आनंदाला पारावार उरला नव्हता.."पण ही इथं कशी..?, मला भेटायला तर नसेल ना आली..?"अशा अनेक विचारांनी त्याच्या मनात एकच गर्दी केली..असो..पण आता एकदा तरी हिची नजर माझ्याकडे जाऊ दे देवा" असं मनात म्हणत असतानाच बस आली, तशी ती उठली आणि चौकशी करू लागली..तोवर इतर लोक बसमध्ये जाऊन बसले होते,पण शिखर मात्र एकसारखा तिच्याकडेच पाहात होता..तेच नेमकं बसमधल्या कंडक्टरने बघितलं तसं लागलीच तो तिच्याशी बोलणं थांबवून लगेच शिखरकडे पाहून म्हणाला "काय भाऊ आजही नंतरच्याच बसने येणार वाटतं.?"

तेव्हा कंडक्टरच्या नजरेच्या दिशेने मान वळवून बघताच तिला शिखर दिसला आणि ती सुद्धा क्षणभर स्तब्ध होऊन आश्र्चर्याने त्याच्याकडे बघतच राहिली..बस आपल्या नेहमीच्याच मार्गाने पुढे निघाली ..पण शिखरला मात्र नव्या आयुष्यातील एक नवी वाट गवसली होती..

दोघंही एकमेकांकडे कितीतरी वेळ तसेच पाहत होते., आता दोघंही एकमेकांच्या बोलण्याची वाट पाहत राहिले,. थोड्यावेळाने शिखरनेच बोलायला सुरुवात केली..

"हाय.. मी शिखर.."

मग तिनेही स्वत:ची ओळख करून दिली

"हेलो..,मी अभिज्ञा.."

"आज इथे पहिल्यांदाच..?"शिखर पुढे काही बोलण्याआधीच तिनं सांगितलं

"हो..आज पहिल्यांदाच ..कंपनीची बस नसल्याने मी या स्टॉपवर येऊन थांबले"

"बरंच झालं" शिखर नकळत बोलून गेला..

पण तिलाही तसंच वाटत होतं..

त्यानंतर बराच वेळ दोघंही शांतच होते.. कदाचित काय बोलावं दोघानाही सुचत नव्हतं.. तितक्यात अचानकच आभाळ भरून आलं.. आणि काही क्षणातच अक्षरशः धोऽ धोऽ पावसाला सुरूवात झाली .. पाऊस सुरू झाला तशी ती वैतागून पुटपुटली "शी बाई..,हा असा अवेळी का आला.?"

शिखर मनातल्या मनात बोलला "आपल्या भेटीला, जणू आपल्या प्रत्येक भेटीचा साक्षीदार व्हायला" ..

पावसाकडे पाहातच शिखरने तिला विचारलं "तुला नाही का आवडत पाऊस.?"

अभिज्ञा त्याच्याकडे पाहत होती, तो पावसाचा किती मनापासून आनंद घेत होता ते तिला जाणवत होतं..

अभिज्ञा म्हणाली "मला अजिबात नाही,..पण तुला पाऊस खूप आवडतो ना..?

"हो , पण तुला कसं माहीती..?" शिखरने विचारलं..

"तुझ्याकडे बघूनच आलं माझ्या ते लक्षात.."अभिज्ञा बोलली

"पण मला आता इथे थांबणं नको वाटतंय, कधी एकदा घरी जाऊन पोहोचते असं झालंय..."

बराच वेळ झाला तरी बस आली नव्हती, नंतर काही वेळाने एक ऑटो दिसला, तेव्हा त्या ऑटोने दोघंही निघाले, रस्त्यावर कुणीही नव्हतं, बाहेर पावसाचा जोर आणखीनच वाढू लागला होता, बऱ्यापैकी ओलं होतंच दोघंही घरी पोहोचले.. नंतर 2-3 दिवस अभिज्ञाच्या कंपनीची बस येणार नसल्याने रोजच बसस्टॉपवर भेट होऊ लागली, हळूहळू भेटी वाढत गेल्या तशी एकमेकांविषयी ओढ अधिकच वाढू लागली.., आता ते दोघंही रोज एकमेकांना भेटल्याशिवाय राहूच शकत नव्हते, शिखरची रोजची सकाळ अभिज्ञाच्या गुड मॉर्निंगच्या फोननेच व्हायची.., आणि ऑफिस नंतरची रोजची भेट तर कधी चुकलीच नाही.. ऑफिसच्या लंचटाईममधे रोज शिखरच्या फोनची अभिज्ञा आतुरतेने वाट पाहात असायची, आणि शिखरच्या फोनला क्षणभर जरी उशीर झाला तरी ती अस्वस्थ व्हायची... वेळप्रसंगी शिखर ऑफिसला सुट्टी घ्यायचा पण ऑफिस सुटण्याच्या वेळी मात्र ठरलेल्या ठिकाणी जाऊन अभिज्ञाची वाट पाहत उभा असायचा..'अभिज्ञा ' हेच त्याच्या सगळ्या प्रश्नांवरचं आता जालीम औषध होतं..

कधी शिखरला वेळेवर मिटींग असली तर अभिज्ञा कधी थंडीत तर कधी पावसात सुध्दा त्याची वाट बघत उभी असायची.. तिला असं तासनतास वाट पाहत उभी असलेली पाहून शिखर धावत मागून जाऊन हळूच तिच्या गळ्यात हात टाकत तिला सॉरी म्हणायचा आणि तिच्याकडे पाहून गोड हसायचा, हसताना शिखरच्या गालावर जी सुरेख खळी पडायची,ती पाहिल्यावर अभिज्ञा त्याच्यावरचा सगळा राग आणि दिवसभराच्या कामाचा थकवा क्षणातच विसरून त्याच्या मिठीत हरवून जायची.. रोज रात्री झोपण्यापूर्वी पांघरूणात शिरल्यावर बाजूला झोपलेल्या आईला जराही शंका येणार नाही इतक्या हळू आवाजात बोलत एकमेकांचा आवाज कानात खोलवर साठवून घेत, एकमेकांविषयी गोड गुलाबी स्वप्न मनात रंगवतच गाढ झोपी जायचे... एकदा एका रविवारी शिखर ऑफिसची महत्त्वाची मिटींग आहे सांगून घराबाहेर निघाला, वाटेतून अभिज्ञाला पिकअप केलं. आणि दोघंही लाँगड्राईवला गेले..

याआधी ते रविवारी कधीच भेटले नसल्याने अभिज्ञालाही आश्चर्य वाटत होतं.. खूप फिरल्यावर शिखर एका चौकात येऊन थांबला, हा तोच चौक होता जिथे त्यांची पहिली नजरभेट झाली होती, तिथे आल्यावर शिखरने सुंदर नाजूकशा लाल रंगाच्या गुलाबाच्या कळ्यांचा गुच्छ अभिज्ञाच्या हातात दिला आणि तिच्या डोळ्यात बघत म्हणाला "या गुलाबाच्या कळीचं उमलून फुल होतं तसं आपल्यातलं प्रेम असंच कायम फुलत,बहरत राहावं यासाठी आयुष्यभर मला साथ देशील ना..?"

शिखर हे सगळं अगदी तिच्या मनातलंच बोलत असल्याने ती आता खरंच नि:शब्द झाली होती.. कितीतरी वेळ ती त्याच्या डोळ्यात तशीच बघत राहिली, नकळत तिच्या डोळ्यातून आनंदाश्रु वाहू लागले ..शिखरने दोन्ही हातांच्या ओंजळीत तिचा चेहरा धरला आणि त्याने त्याचे ओठ तिच्या कपाळावर टेकवले.. तिच्या डोळ्यातील अश्रूनींच तिचा होकार सांगितला होता..

आता शिखर आणि अभिज्ञा दोघंही एकमेकांच्या मिठीत स्वत:ला हरवून बसले होते..

आणि त्यांच्या या ही भेटीचा साक्षीदार होण्यासाठी पाऊस सोबतीला आला होता.. त्यांच्यातल्या प्रेमासह आपल्या सरींनी त्यांना चिंब भिजवायला..

- सौ.तृष्णा खर्डेनवीस आंबेकर

# समारोप

रसिकहो मागच्या अंकापासून पुढील सगळ्या अंकांमध्ये आपण वेगवेगळ्या लेखिकांना यात सामावून घेणार आहोत.नवोदित आणि साहित्याची आवड असलेल्या "ती" चं हे हक्काचं पान असेल. प्रत्येक स्त्री मध्ये कुठेतरी एक लेखिका असते. लेखिका नसली तरी एखादी गोष्ट रंगवून सांगण्याची तिच्यात कला असते. ती उत्तम निवेदिका असते. तिच्यात हे सगळे गुण असतात फक्त ते कधी कधी सुप्त राहून जातात त्या गुणांना या माध्यमातून जागृत करण्याचा हा प्रयत्न. तेव्हा या अंकात असलेला पाऊस तुम्हाला आवडला का हे सुद्धा नक्की कळवा..

आपलं प्रेम असंच असू द्या.पुन्हा भेटूया पुढील महिन्यात नवीन विषय आणि मासिकांकासह…!

आणि हो, तुमच्या पैकी कुणाला या उपक्रमात सहभागी व्हायचे असेल तर तुम्ही नक्की सहभागी व्हा. आम्ही आपल्या प्रतिक्षेत आहोत. या वाक्यावर क्लिक करून आपण या उपक्रमात सहभागी होऊ शकता. संपूर्ण  नियमावली ही या फॉर्म वर उपलब्ध आहे.

आमचे आधीचे प्रकाशित अंक :

मार्च २०२१

एप्रिल २०२१

मे २०२१

जून २०२१

आपल्याला  जर अंक आवडला असेल तर  कृपया  आपले अमूल्य मत आम्हाला नक्की कळवा, खाली अभिप्रायासाठी लिंक देत आहोत..

**अभिप्राय**

तो शब्दमोहोर **ती** चा चहू दिशांत मोहरावा..

त्याच्या सुवासानेच केवळ आसमंत दरवळावा..!!

ती लेखणी दिवसागणिक **सायली** सम फुलावी..

अन् तिच्या फुलण्याची नित्यच, **अक्षय** रूपे असावी..!!

तो शब्दांचा सडा, **प्राजक्ता** सम अंगणी पडावा..

त्याचा **स्वर्णिम्** परिमळ मनामनात रुजावा..!!

त्या **जाई** च्या अपूर्वतेची गोडी सदा रहावी..

डोळ्यांच्या त्या **तृष्णेला** मग कसलीच भ्रांत नसावी..!!

या साऱ्यांच्या गंधाने ती **मृण्मयी** गंधित व्हावी..

पुन्हा एकदा तिच्यातूनच **ती** ची **निर्मिती** व्हावी..!!

ही सारी शब्द सुमने त्या **रेणुकेला** अर्पावी..

तिच्याच रंगी रंगून ही **भार्गवी** शब्दांकित व्हावी..!!

**- कु. भार्गवी बाबरेकर**


आला आषाढ श्रावण
आल्या पावसाच्या सरी
किती चातक चोचीने
प्यावा वर्षा ऋतू तरी